सत्यप्रभा दि. 16/12/2022

# जबरी चोरी प्रकरणातील दोघांना दोन तासाचे आत अटक

**नांदेड दि.१५ –** नवीन हस्सापूर येथे झालेल्या चोरीच्या घटनेतील आरोपींचा शोध घेण्यासाठी वजिराबाद पोलिस स्टेशन आणि लिंबगाव पोलिस स्टेशनच्या पथकाने शोध घेवून दोन तासांच्या आत या घटनेतील आरोपींना अटक केली आहे.

पोलिस प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार नवीन हस्सापूर येथे राहणारे तक्रारदार आब्दुल शाहेद आब्दुल समद यांनी पोलीस ठाणे लिंबगांव येथे तक्रार दिली की, दि.१३डिसेंबर रोजी तुषार माने, रितेश माने, राम जाधव व चिक्या नावाचे व्यक्तींनी माझे घरामध्ये जाऊन माझ्या पत्नीस चाकु मारुन दुखापत करून सोन्या चांदीचे दागिणे जबरीने हिसकाऊन घेउन मला सुध्दा रस्त्यात चाकुने मारुन जखमी केले वगैरे तक्रारीवरुन आरोपीतां विरुध्द पोलीस ठाणे लिंबगांव येथे गु.र.न. १७७/२०२२ कलम २९७,३९४,३४ भारतीय दंड विधान प्रमाणे दाखल करुन गुन्हयाचा तपास पोउपनि कोंडीबा केजगीर यांचेकडे दिला.



सदर गुन्हा दाखल होताच पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधिक्षक अविनाश कुमार, अपर पोलीस अधिक्षक खंडेराव धरणे, उप विभागीय पोलीस अधिकारी चंद्रसेन देशमुख, शहर, उप विभागीय पोलीस अधिकारी सिध्देश्वर भोरे यांनी दाखल गुन्हयातील आरोपीतांना तात्काळ अटक करणेबाबत सुचना दिल्या.

सदर सुचनांप्रमाणे उप विभागीय पोलीस अधिकारी उप विभाग चंद्रसेन देशमुख, पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार, पोलीस ठाणे वजीराबाद नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रकांत पवार, सहा. पोलीस ठाणे लिंबगांव, वजीराबाद पोलीस स्टेशन येथील गुन्हे शोध पथकाचे अधिकारी संजय निलपत्रेवार, दत्तराम जाधव, संतोष बेलुरोड, व्यंकट गंगुलवार, बालाजी कदम असे व पोलीस स्टेशन लिंबगांवचे पोलीस अधिकारी कोंडीबा केजगीर, पोलीस अंमलदार प्रमोद मोरे, प्रकाश पेदेवाड, मुंजाजी चौरे, बाळासाहेब कळकेकर, उत्तम देवकते यांनी संयुक्तरित्या आरोपीतांचा शोध घेण्यास सुरुवात केली.

नमुद पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी यातील आरोपीतांचा शोध घेत असतांना आरोपी तुषार मधुकर माने, २४ वर्षे व्यवसाय मजुरी राहणार सोमेश कॉलनी कलामंदीर, नांदेड व आरोपी राम सदाशिव जाधव २२ वर्षे रा. सोमेश कॉलनी, कलामंदीर नांदेड यांना तात्काळ ताब्यात घेऊन अटकेची कार्यवाही केली.

नमुद आरोपीतांना गुन्हा दाखल होताच दोन तासाचे आत अटक करण्यात आले असल्याने वरीष्ठांनी नमुद पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे कौतुक केले आहे.